स्थायी समितीच्या **सोमवार दिनांक 15–12–2014** रोजी **दुपारी 4–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. नरेन्द्र उर्फ बाल्या गोंविदराव बोरकर | **अध्यक्ष** |
| 2. | सौ. पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| 3. | सौ. सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| 4. | सौ. भावना प्रशांत ढाकणे | सदस्या |
| 5. | श्री. हरिष सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| 6. | सौ. सविता मनोज सांगोळे | सदस्या |
| 7. | श्री. दुनेश्वर सुर्यभानजी पेठे | सदस्य |
| 8. | श्री. सागर दामोधर लोखंडे | सदस्य |
| 9. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 10. | सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 11. | सौ. संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 12. | श्रीमती इशरद नाहीद मो. जलील अंसारी | सदस्या |
| 13. | सौ. सिंधु रामा उईके | सदस्या |
| 14. | सौ. रविंदर कौर बावा | सदस्या |
| 15. | श्री. देवा प्रसाद उसरे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. प्रशांत रामराव धवड | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. श्याम वर्धने, निगम आयुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 370</u>:— मोबाईल टॉवर उभारणीकरीता विभागाचे नाहरकत प्रमाणत्र घेतांना प्रतिवर्ष प्रती टॉवर रू. 25,000 (रू. पंचेवीस हजार फक्त) शुल्क आकारणी करणेबाबत.

स्थायी समिती ठराव क्र. 18 दि. 12/05/2014 सुधारीत अग्निशमन सेवा शुल्क व इतर कार्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क तक्ता 'अ' व 'ब' याप्रमाणे शुल्क आकारणी उपरोक्त ठरावाद्वारे मंजूर करण्यात आले.

राज्यातील मंजूर योजना क्षेत्रामध्ये टॉवरची उभारणी व अनुषंगीक बाबींसाठी नविन विनिमय अंतर्भुत करण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने क्र. टिपीएस 1810/1975/प्रक्र नविन /65/12/विमो/नवि–13 दि. 04 मार्च 2014 अन्वये शासन निर्णय पारित केला आहे.
सदर शासन निर्णयातील परीशिष्ट 'अ' च्या क्र. 4 मध्ये याबाबतची कार्यपध्दती नमुद करण्यात आली असून त्यामधील अनु क्र 'M' मध्ये पुढील प्रमाणे तरतुद निश्चित करण्यात आली. *No objection certificate of the Chief Fire Officer of the concern Urban Local Body, and elsewhere, of the Director of*

*Fire Services, only in case of High Rise Buildings having height 15 meters or more measure from ground level.* या शासन निर्णयातील तरतुदींनुसार मोबाइल टॉवर उभारतांना अग्निशमन विभागाकडील ना–हरकत दाखला घेणे बंधनकारक आहे.

विभागाकडे Ground Base Tower, Ground Base Mast, Roof Top Tower, etc. अशा प्रकारचे मोबाईल टॉवर उभारणीसाठी विभागाकडून नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याकरीता अनेक कंपन्यांचे विभागाला अर्ज प्राप्त होत असतात.

उपरोक्त मंजूर स्थायी समिती ठरावामध्ये **तक्ता 'ब' अनु क्र. 1(6) व्यापार व्यवसायासाठी फायर फिटनेस प्रमाणपत्र शुल्क रू. 2,500 प्रमाणे आकारणी करणे (Trade NOC) अशी तरतुद आहे.**

याप्रमाणे मोबाइल टॉवर उभारणीसाठी नाहरकत प्रमाणपत्र घेण्याकरीता विभागाकडून रू. 2,500 प्रमाणे शुल्क आकारण्यात येत असते. उपरोक्त शुल्क आकारणी तरतुदीमध्ये मोबाईल टॉवर, इतर टॉवर या नावाचा स्पष्टपणे उल्लेख नसल्याने शुल्क आकारणी करून घेण्यास प्रशासकीय अडचण येत असते. यामध्ये अशा टॉवर उभारणीकरीता अग्निशमन शुल्क आकारणीचे स्पष्ट उल्लेख करून घेणे आवश्यक आहे. महानगरपालिकेची उत्पन्नाची बाब विचारात घेता शुल्क वाढ करणे आवश्यक आहे.

करीता विभागाकडे **Ground Base Tower, Ground Base Mast, Roof Top Tower, etc. अशा प्रकारचे मोबाईल व इतर टॉवर** उभारणीसाठी विभागाकडून नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याकरीता प्रतिवर्ष प्रती टॉवर **रू. 25,000 (रू. पंचेवीस हजार फक्त) याप्रमाणे शुल्क** आकारणी करून घेण्याचे समितीने विचारात घेऊन रु. 30,000/– प्रति टॉवर दराची आकारणी करण्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 371 :– धंतोली झोन क्र. 4 सन 2014–15 चे प्रभाग क्र. **57 अ, 66 अ, आणि 66 ब** साठी पद क्र. 620 (A43901371914) अंतर्गत मंजुर रूपये 6.00 लक्ष मा. नगरसेवकांचे विनंती नुसार पद क्र. 676 (A42001370509) मध्ये वळते करण्याचा प्रश्न तसेच पद क्र. 716 (A42301770722) मध्ये मंजुर राशी रू. 45.00 लक्ष पद क्र. 561(A45620172909)चे रू. 3.50 लक्ष पद क्र. 620 (A43920171906) चे रू. 10.00 लक्ष पद क्र. 676 (A42001370509) मध्ये वळते करणे व महसूली पदाअंतर्गत पद क्र. 53 (A2560130817)चे रू. 2.00 लक्ष. पद क्र. 145 (A22820130805)व 251 (A23420130808) चे रू. 3.00 लक्ष , पद क्र. 334 (A27520130819) चे रू. 2.00 लक्ष चे पद क्र. 326 (A22920130806) पद क्र. 459 (A25220130815) व पद क्र. 460 (A25320130816) मध्ये अनुक्रमे वळते करण्याचा प्रश्न विचारात घेवून पुढील मंजुरीसाठी मा. स्थायी समितीकडे सादर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| मा.प्रभाग समीतीद्वारा सुचविल्यानुसार व मा. सदस्य प्रभाग समिती याच्या विनंती नुसार पुर्नविनियोजन केल्यानंतर झोन कार्यालयाकरीता पदा अंतर्गतची स्थिती. | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पद शिर्ष | स्थायी समितीद्वारे झोन कार्यालयासाठी साठी एकूण मंजुर राशी (लक्षात) | | प्रभाग समितीद्वारे वळते करण्यात करीता प्रस्तावित राशी (लक्षात) | | वळते केल्यानंतर या पदा अंतर्गत झोनकरीता एकूण प्रस्तावित राशी (लक्षात) | | शेरा |
| | पद क्र. | राशी | पद क्र. | राशी | पद क्र. | राशी | |
| **A43901371914** | **620** | **35.00** | **620** | **16.00** | **620** | **19.00** | प्रभाग क्र. 57 अ, 66 अ, 66ब करीता राखीव राशी 0.00 झोन कार्यालयाकरीता राखीव राशी 1९00 लक्ष |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **A42301770722** | **716** | **50.00** | **716** | **45.00** | **716** | **05.00** | झोन कार्यालयाकरीता राखीव राशी 5.00 लक्ष |
| **A42001370509** | **676** | **108.00** | **676** | **64.50** | **676** | **172.50** | प्रभाग क्र. 57 अ, व 66 अ, ब करीता प्रत्येकी 11.00 लक्ष राखीव झोन करीता एकूण 58.50 लक्ष राखीव |
| **A45620172909** | **561** | **3.50** | **561** | **3.50** | **561** | **0.00** | |
| **A 25620130817** | **53** | **2.00** | **53** | **2.00** | **53** | **0.00** | |
| **A 22820130805** | **145** | **10.00** | **145** | **6.00** | **145** | **4.00** | |
| **A 23420130808** | **251** | **5.00** | **251** | **3.00** | **251** | **2.00** | |
| **A 22920130806** | **326** | **5.00** | **326** | **4.00** | **326** | **9.00** | |
| **A 27520130819** | **334** | **10.00** | **334** | **2.00** | **334** | **8.00** | |
| **A 25220130815** | **459** | **5.00** | **459** | **3.00** | **459** | **8.00** | |
| **A 25320130816** | **460** | **3.00** | **460** | **6.00** | **460** | **9.00** | |

<u>ठराव क्रमांक 372</u> :— जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूत्थान अभियान अंतर्गत मंजूर पेंच टप्पा — 4, नागपूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजना राबविण्याकरीता रितसर निविदेद्वारा नियुक्त व्यवस्थापकीय सल्लागार मे. डी.आर.ए. —एस.टी.सी. (संयुक्त) यांना जून 2014 पर्यंत दिलेली मुदत वाढ संपुष्टात आली आहे. तथापी त्यांची सेवा अद्याप सुरू असून योजनेची कामे निर्धारीत कालावधीत पूर्ण करणे गरजेचे असल्यामुळे व्यवस्थापकीय सल्लागाराची सेवा घेणे अपरिहार्य आहे.

करीता सल्लागाराच्या पुढील खर्चाकरीता एकूण रू. 15.86 कोटी चे (स्थायी समिती ठराव क्र. 421, दि. 30.12.2013 अन्वये मंजूर राशी रू. 13.85 + अतिरिक्त संभावित खर्च रू. 2.01 = रू. 15.86 कोटी) सुधारीत प्रस्तावाला मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 373</u> :— प्रभाग क्र. 71 "अ", "ब" अंतर्गत प्रियदर्शनी नगर, साईनाथ नगर, टाकळी सिम भांगे विहार येथील विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रू. 2999963/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र. 682 (ए 22001330803) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा काढण्याच्या सुचनेसह एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 374</u> :— प्रभाग क्र. 72 "अ", "ब" व "क" अंतर्गत कन्नमवार नगर, मनीष लेआउट व जयताळा येथील रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रू. 4499916/—रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे व व या आर्थिक वर्षात पद क्र. 682 (ए 22001330803) अंतर्गत तरतुद मुक्त

करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा काढण्याच्या सुचनेसह एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 375 :– मौजा–नागपूर येथील नगर भुमापन क्र. ४१७ कल्याणेश्वर मंदिर रोडवरील पाण्याच्या टाकीच्या लगतची १२२.३४ चौ.मी. जागेचा ३० वर्षाचे भाडेपट्टीवर वाटप करण्याकरिता श्री. विश्वेश्वर तुकारामजी गिरीपूंजे यांचेकडुन प्राप्त झालेली i) रु. ३३,५०,०००/– ची महत्तम दराची निविदा मंजुर करणे.

ii) रु. ८३,७५०/– वार्षीक भुभाडे प्रती वर्ष प्रमाणे आकारणी करणे,

iii) रु. ६,६५,०६६/– मागील १५ वर्षाकरीता जागा वापर शुल्काची आकारणी करणे

याबाबत मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 376:– प्रभाग क्र.62–ब अन्नपुर्णा नगर, धनगवळी नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव रु.33,27,600/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व पद क्र. A42001374612 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा काढण्याच्या सुचनेसह एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 377:– प्रभाग क्र.62–ब महाकाली नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव रु.30,11,785/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व पद क्र. A42001374612 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा काढण्याच्या सुचनेसह एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 378:– प्रभाग क्र.67–ब बाळकृष्ण नगर, सेवादल नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव रु.34,92,630/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व पद क्र. A42001374612 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा काढण्याच्या सुचनेसह एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 379:– नागपूर महानगरपालिकेच्या मुख्यालय,क्षेत्रीय कार्यालय व इतर महत्वाच्या विभागामध्ये असलेली मालमत्ता, इमारतीची देखरेख व सुरक्षा करण्याकरिता एकुण 3 पर्यवेक्षक व 79 सुरक्षा रक्षक ( माजी सैनिक) कार्यरत असुन कंत्राटाची मुदत दिनाक 15.12.2014 ला संपुष्टात येत आहे. पुढील कालावधी करीता दिनांक 15.06.2015 पर्यंत शासनाचे किमान वेतन व इतर लागु असलेले भत्ते प्रमाणे महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ, पुणे (मेस्को) यांना कंत्राटाची मुदतवाढ मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 380 :– नागपूर शहरातील 30 सिमेंट रस्त्यांचे रू. 101.18 कोटीचे बांधकाम करण्याकरिता मे. युनिटी इन्फ्राप्रोजेक्टस् लि. यांना 77.50 कोटीचे (23.40 टक्के कमी) कार्यादेश देण्यात आले. कंत्राटदाराने करारनाम्याची पूर्तता केलेली नसल्यामुळे त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करण्याचा प्रस्ताव तयार करून आकारण्यात आलेल्या दंडाच्या रकमेबाबत कंत्राटदारास अवगत करण्यात आले. कंत्राटदाराने विविध कारणे देवून दंडात्मक रक्कम माफ

करण्याबाबत केलेली विनंती विभागातर्फे अमान्य करण्यात आली. म.न.पा. व कंत्राटदार यामध्ये याबाबत वाद सुरू झाला.

मे. युनिटी इन्फ्राप्रोजेक्टस् लि. यांनी पत्राद्वारे प्रलंबित बिलाचे भुगतान करण्याबाबत तसेच सुरू बिलाचे भुगतान करण्याबाबात सुरू असलेल्या वादावर तोडगा काढण्याकरीता निविदा अटीनुसार आर्बीट्रेटरची नेमणुक करण्याबाबत विनंती केली. निविदा अटीनुसार सक्षम अधिका–याची रितसर मान्यता प्राप्त करून श्री. डी. एन. पोटदुखे, निवृत्त मुख्य अभियंता, सा.बां. विभाग, यांची दिनांक. 24.05.2013 ला आर्बीट्रेटर म्हणुन नियुक्ती करण्यात आली.

आर्बीट्रेटरच्या निर्देशानुसार विविध बैठकीचे आयोजन करण्यात आले. अशाप्रकारे पहिली बैठक दि. 05.06.2013 ला घेण्यात आली व अंतीम बैठक 23.04.2014 ला पार पडली. आर्बीट्रेटरने दि. 05.09.2013 ला अंतरीम अवार्ड (interim Award) पारीत केला त्यानुसार कंत्राटदारास कोणताही दंड न आकारता Escalation सहीत संपूर्ण धावते देयकाचे (R.A. Bill) भुगतान करण्यात आले.

आर्बीट्रेटरने अंतीम अवार्ड (Final Award) दि. 09.07.2014 ला पारीत केला. पारीत केलेला अवार्ड पूर्णपणे एकतर्फी कंत्राटदाराच्या बाजूने होता. म.न.पा.चा कोणताही दावा त्यामध्ये मान्य करण्यात आलेला नाही. करीता अवार्डला challenge करण्याकरीता प्रस्तावित करण्यात आले.

नस्तीत नमुद केल्याप्रमाणे प्रथम 09.07.2014 च्या लवादावर अपील करण्यास्तव आदेश नमुद आहे. तदनंतर आर्बीट्रेटरच्या लवादाप्रमाणे (अवार्डप्रमाणे)देय असलेली राशी रू. 130.23 कोटी म.न.पा ला द्यावी लागेल. तसेच अपील केल्यानंतर वरील काम नवीन टेंडर काढून करावा लागेल. याकरिता वर्ष 2014–15 च्या दरावर नस्तीत तयार करण्यात आलेले विवरण पत्रानुसार CSR दरावर निविदा प्राप्त झाल्यास अंदाजित खर्च रू. 112.38 कोटी अपेक्षित आहे. मे. युनिटी इन्फ्राप्रोजेक्टस् लि. यांनी एमिकेबल सेटलमेंट करीता दि. 13.08.2014 ला कार्यकारी अभियंता (प्रकल्प) यांना पत्र क्र. UIL/CCRoad/NGP/Site/2014/254 दिनांक 11.08.2014 च्या पत्रानुसार दिले असुन वरील वस्तुस्थिती व लागणारा अंदाजित खर्च पाहता तसेच नविन टेंडर काढून अंतीम केल्यावर व तद्नंतर मशिनरी मोबीलाईजेशन करीता लागणारा वेळ लक्षात घेता एमिकेबल सेटलमेंट बाबत चर्चा करण्यास्तव व एक मध्यम मार्ग काढण्यास्तव मा. आयुक्त साहेबांची मंजूरी घेवून चर्चा करण्यास्तव म.न. पा. चे पत्र क्र. 104, दि. 22.08.2014 पत्रान्वये व 19.08.2014 ला 3:30 वाजता झालेल्या चर्चे नुसार त्यांना बोलाविण्यात आले व दि. 9/9/2014 व 9/10/2014 ला चर्चा करण्यात आली.

चर्चेमधील वस्तुस्थिती खालीलप्रमाणे नमुद करण्यात येते.

अवार्डप्रमाणे एकूण प्रस्ताव नस्ती मधील पृष्ठ क्रमांक N/25 मध्ये विस्तृत विवरणात नमुद आहे. यात Option (i) ते option (iv) वर चर्चा झाली.

(1) Option (i) लवादाप्रमाणे येणारी राशी जी मनपाला मान्य नाही. (संपूर्ण विवरण नस्ती मधील पृष्ठ क्र. N/ 25 वर नमूद आहे) – रू. 130.23 कोटी

(2) Option (ii) म.न.पा.द्वारे एमिकेबल सोल्युशन करिता प्रस्तावित Option (ii) वर नमुद करण्यात येते.
(संपूर्ण विवरण नस्ती मधील पृष्ठ क्र. N/ 25 वर नमूद आहे) तो – रू. 92.87 कोटी
कंत्राटदाराने मान्य केलेला नाही आणि
मा. अधिक्षक अभियंता यांचे समक्ष चर्चा करून
आपले सुधारीत प्रस्ताव दिले जे

(3) Option (iii) वर नमूद आहे. त्याप्रमाणे – रू. 113.31 कोटी

(4) Option (iv) तद्नंतर CSR 2013–14 प्रमाणे 107.025 कोटी व 2014 – 2015 CSR ची 5% वाढ धरली तर अंदाजित खर्च रू. 112.38 कोटी येईल. या करिता याबाबत पुन्हा बैठक घेण्यात यावी. असा निर्णय घेण्यात आला व पूढची दिनांक 22.09.2014 ची व वेळ 11:00 वाजता ची ठरली.

तद्नंतर ही वाटाघाटी बैठक परत 03.11.2014 ला दुपारी 3:00 वाजता मा. अधिक्षक अभियंता यांचे समक्ष करण्यात आली व मे. युनिटी इन्फ्राप्रोजेक्टस् लि. तर्फे श्री. निलेश जामदार यांनी आपले मत मांडले असून नस्तीत नमूद आहे. त्यात त्यांनी 2013–14 च्या दरसुची प्रमाणे प्रस्ताव दिले.

| | | |
|---|---|---|
| 2013–14 च्या दरसुचीप्रमाणे प्रकल्पाची किंमत | – | 107.025 कोटी |
| आमच्या तर्फे सन 2013–14 च्या दरावर रिबेट @ 2.50 टक्के | – | 2.675 कोटी |
| **एकूण** | – | 104.35 कोटी |
| जुलै 2013 पासूनचे अंदाजित भाववाढ @ 3.4 टक्के | – | 3.640 कोटी |
| | – | 107.99 कोटी |
| सुधारीत आयडल क्लेम | – | 5.00 कोटी |
| आर्बीट्रेशनचा 50 टक्के खर्च | – | 0.05 कोटी |
| **असे एकूण अंदाजे रु.** | – | 113.04 कोटी |

वाटाघाटीचे विस्तृत विवरण नस्तीत नमूद आहे. त्याप्रमाणे अंतीम वाटाघाटीनंतर घेतलेल्या निर्णयाप्रमाणे खालील प्रस्ताव सादर.

अंतीम वाटाघाटीनंतर कंत्राटदार मे. युनिटी इन्फ्राप्रोजेक्ट यांनी सादर केलेला प्रस्ताव :

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Cost of Balance work | - | 107.025 |
| 2. | Rebate by Contract | - | (-) 2.68 |
| 3. | Escalation Claim | - | 3.64 |
| 4. | Loss due to Idling of resources | - | 5.00 |
| 5. | Arbitration Charges | - | 0.05 |
| | Total | - | 113.04 कोटी |

वरील प्रस्ताव प्रमाणे म.न.पा. द्वारे सिमेंट रस्त्याचे बांधकाम वादात अडकल्याने काम न झाल्यामुळे तसेच आर्बीट्रेशनचा अवार्ड झाला असल्याने उर्वरित कामाकरिता खालीलप्रमाणे राशीचा खर्च बाबत नमुद करण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| मुळ कंत्राटाची एकुण राशी (निविदा किंमत 101.18 – 23.40 टक्के कमी) | – | रू. 77.50 कोटी |
| एप्रिल 2013 पर्यंत पूर्ण झालेले काम | – | रू. 9.75 कोटी |
| उर्वरित बांधकामाकरिता कंत्राट राशी | – | रू 67.752 कोटी |
| उर्वरित कामाकरिता जुने निविदेप्रमाणे लागणारी राशी = | – | रू. 87.56 कोटी |

(यात 23.40 टक्के ने कमी असलेली निविदा प्रमाणे येणारी उर्वरित कामाकरिता राशी रू. 67.752+ दरवाढाची राशी रू 19.81 ( फक्त 2009 ते एप्रिल 2013 पर्यंतची दरवाढ. एप्रिल 2013 पासून काम पूर्ण होईपर्यंतची दरवाढ समाविष्ठ नाही. )

2013–14 प्रमाणे व 2014–15 प्रमाणे वाढ धरून

| | | |
|---|---|---|
| येणारी राशी | – | रू. 112.38 कोटी |
| वाटाघाटी प्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेली राशी | – | रू. 113.04 कोटी |
| म.न.पा. अतिरिक्त येणारा खर्च (113.04 –87.56) | – | रू. 25.48 कोटी |

विस्तृत विवरण नस्तीत उपलब्ध आहे.

वरील वस्तुस्थितीवर विचार करून व लागणारा खर्च रू. 113.04 कोटी सिमेंट रस्ते बांधकाम करण्याबाबतचा प्रस्ताव विभागाद्वारे पूढील प्रमाणे सादर करण्यात आला त्यात कार्यकारी अभियंता (प्रकल्प ) यांनी रू. 3 कोटीचा कॅश फ्लो दर महा या प्रकल्पाला लागणार आहे आणि कायदयाचे सल्लागार यांचे अभिमत घेवून प्रस्ताव सादर करणे योग्य राहील असे नमूद केले होते. त्या अनुषंगाने प्र.ले.वि.अ. यांचे मत नस्तीत नमुद आहे. यात कॅश फ्लो बाबत प्र.ले.वि.अ. यांनी खालीलप्रमाणे मत नमुद केले आहे.

"सद्यस्थितीत म.न.पा. ची वित्तिय स्थिती विचारात घेता चालु वित्तीय वर्षात कमीत कमी वित्तीय देयता निर्माण होईल या दृष्टीकोणातून कामाचे नियोजन करण्यात येवून कॅश फ्लो कमी (1 कोटीच्या आत) ठेवावा व पूढील वर्षात कॅश फ्लो व कामाचा वेग वाढवावा या बाबीचे अधिन प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्यास तसेच प्रस्तावित केल्यानुसार कायदयाचे अभिमत घेवून अंतीम कार्यवाही करण्यास हरकत नसावी असे मत दिले".

कायद्याचे सल्लागार यांचेसुध्दा अभिमत घेण्यात आले असून यांनी आपले अभिमत नस्तीत नमुद आहे. त्यांचे अभिमत खालील प्रमाणे

**" Today i.e. on 03-12-2014 Mr. Mahesh Gupta E.E. (P) discussed with me and requested to give legal opinion on following issues :-**

**1. Legal vetting of Agreement.**

**2. What about the Appeal filed by the NMC challenging the Award dated 09th July, 2014.**

**3. What about the binding of the Award.**

**I have to submit to the above referred points asked by Mr. Mahesh Gupta as Under :-1. As to no. 1. : It is the total administrative domain of the Department to settle the matter on their conditions. Please put up your proposed Agreement for legal vetting, it can be verified & corrected in the eyes of Law.**

**2. As to no. 2. : If both the parties agrees and Department asks then the Appeal can be withdrawn.**

**3. As to no. 3. : Both the parties should agree in the upcoming Agreement that both the parties will abide themselves by it and will not challenge or enforce the Award dated 09-07-2014."**

वरील नमुद वस्तुस्थिती प्र.ले.वि.अ. यांचे मत कायद्याचे सल्लागार यांनी नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार खालीलप्रमाणे स्थायी समिती कडे मंजूरीस्तव व उचित निर्णयास्तव सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन,

मे. युनिटी इन्फ्राप्रोजेक्ट लि., कंपनी सोबत वाटाघाटी केल्यानंतरचा पर्याय महानगरपालिकेतील सिमेंट रस्ते बांधकाम प्रकल्प लवकरात लवकर होण्याचे दृष्टीकोणातून स्विकृत करण्याच्या निर्णय घेण्यास विचार करण्यात यावे. व अशा परिस्थितीत महानगरपालिकेला उर्वरित कामाचा खर्च रू. 107.985, आयडल चार्जेस 5.00 कोटी व आर्बीट्रेशन चार्ज 0.05 कोटी असे एकुण 113.04 कोटी खर्च येईल. त्याप्रमाणे खालील अ, ब व क प्रमाणे प्रस्तावास मंजूरी प्रदान करावी लागेल.

(अ) सिमेंट रस्त्यांच्या उर्वरित बांधकामाकरिता येणारा अंदाजित खर्च रू. 107.985 कोटी व त्यामधे अंतर्भुत वृध्दीला (Escalation) रू. 3.640 कोटी जुलै 2013 पासून लागणा–या खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

(ब) कंत्राटदाराची आयडल चार्जेस (Idle Charges) ची रक्कम रू. 5.00 कोटी दोन टप्प्यामध्ये भुगतान करण्याची मंजूरी प्रदान करण्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

(क) मंजुरीप्राप्त झाल्यानंतर पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

1) कंत्राटदारासोबत सामंजस्य करार (Memorandum of Understanding) व पुरक करारनामा यांची कायद्याच्या सल्लागारामार्फत लिगल वेटींग करून व पूरक करारनामा आणि सामजंस्य करार केल्यानंतरच विभागाने ऑर्बीट्रेशन अवार्डवर न्यायालयात दाखल केलेली अपील मागे घ्यावी.

2) करारनामाची अटीनुसार दोन्ही पक्षानी आर्बीट्रेशन अवार्डला (दि. 09.07.2014) चॅलेंज (challenge) करणार नाही किंवा त्याला एनफोर्स (enforce) करणार नाही. याबाबत हमी घ्यावी लागेल. म्हणजेच दि. 09.07.2014 ला पारीत केलेला अवार्ड संपूष्ठात येईल.

उपरोक्त प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 381</u>:— नागपूर महानगरपालिकेतील मा. पदाधिकारी व अधिका–यांना कार्यालयीन कामाकरीता चार चाकी वाहणे (Taxi permit Tata Indica, Tata Indigo, Maruti Van & Auto Rickshaw with Loud Speaker) पुढील दोन (सन 2015–2016 ते 2016–2017) वर्षाकरीता भाडेतत्वावर घेवून देण्यास्तव नविन दर करार करण्याकरीता मनपा तर्फे नविन निविदा सुचना ची जाहीरात स्थानिक वर्तमान पत्रात व online वर देऊन ई–निविदा बोलाविण्यास्तव मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 382</u> :— कलम 33 अ, जल ( प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण ) अधिनियम 1974 आणि कलम 31 अ, हवा ( प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण ) अधिनियम 1981 या बरोबर नागरी घनकचरा ( व्यवस्थापन व हाताळणी ) नियम 2000 प्रमाणे आदेशाचे अनुषंगाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास पूर्तता अहवाल पाठविण्याबाबतचा प्रस्ताव विचारात घेवून मनपा महासभेकडे अंतिम मंजूरीकरीता सादर करण्याचा प्रश्न तसेच,

महानगरपालिकेस जल (प्रदुषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, 1974 अंतर्गत प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थांवर त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये निर्माण होणारे घरगुती सांडपाणी गोळा करून त्यावर योग्य ती उपाययोजना व प्रक्रिया करून मगच त्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावणे, योग्य ते संमतीपत्र जल व हवा (प्रदुषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियमाप्रमाणे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून घेवून त्यातील अटी व शर्तींची पूर्तता कालबध्द रितीने करणे बंधनकारक आहे.

2) हया व्यतिरीक्त महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे दिनांक 06/06/2014 ची पत्रात नमूद सुचनांप्रमाणे मनपा कार्यक्षेत्रामध्ये निर्माण होणाऱ्या नागरी घनकचऱ्याचे स्वतंत्र वर्गीकरण (जैविक विघटनशील/अविघटनशील ( Biodegradable@Non–Biodegradable) आणि पूर्णनिर्माण घनकचरा ( Recoverable Waste ) करून त्याची विल्हेवाट सांडपाणी पुरवठा व स्वच्छता विभाग महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय क्र.–1003/प्रक्र. 675/जाक–22 दिनांक 26/08/2003 प्रमाणे योग्य ती जागा मान्यता मिळालेल्या ठिकाणी नागरी घनकचरा

(व्यवस्थापन व हाताळणी ) नियम, 2000 मधील तरतुदी प्रमाणे, मा. मुंबई उच्च न्यायलय खंडपीठापुढे दाखल करण्यात आलेल्या सार्वजनिक हिताच्या याचिका क्र. 1740/1198 आणि इतर सुधारित याचिकामधील दिनांक 02/04/2014 चे आदेशा प्रमाणे दिलेल्या विहित मुदतीत कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

3) मा. सदस्य सचिव, मप्रनिम, मुंबई यांचे दिनांक 14/10/2014 चे अन्वये सांडपाणी व्यवस्थापन व नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रत्येक वर्षी एकूण भांडवली खर्चापैकी 25% तरतुद करून या प्रकल्पावर खर्च करावे जेणेकरून सदहू यंत्रणा उभारण्यासाठी योग्य ती आर्थिक तरतूद होवून कायदेशीर पूर्तता पार पाडली जाईल याबाबत सुचविले आहे. **ही बाब विचारात घेता यापूढे नागपूर महानगरपालिकेला दरवर्षीचे अंदाजपत्रकात एकूण भांडवली खर्चाचे 25% तरतुद करून सांडपाणी व्यवस्थापन व नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी खर्च करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा आहे त्या करीता मनपाचे महासभेची मंजूरी आवश्यक आहे.**

महानगरपालिकेने सन 2014–2015 मध्ये स्वच्छता घनकचरा व्यवस्थापन व मलनिस्सारणा करीता महसुली व भांडवली खर्चा करीता एकूण रू 157.03 कोटी ची तरतुद केलेली आहे. तसेच यापूढे नागपूर महानगरपालिकेला दरवर्षीचे अंदाजपत्रकात एकूण भांडवली खर्चाचे 25% तरतुद करून सांडपाणी व्यवस्थापन व नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी खर्च करण्याबाबतचा प्रस्ताव वित्तीय बाबीशी संबंधीत असल्यामुळे व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास पूर्तता अहवाल सादर करावयाचा आहे करीता सदर प्रस्तावास प्रथम स्थायी समितीची मंजूरी आवश्यक आहे. स्थायी समितीच्या मंजूरीनंतर धोरणात्मक स्वरूपाची बाब असल्यामुळे हा प्रस्ताव मनपा महासभेच्या अंतिम मंजूरी करीता सादर करण्यात येईल. स्थायी समितीचे मंजूरीस्तव सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन म.न.पा. महासभेसमोर ठेवण्याच्या शिफारशीसह समितीने विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 383**:— "नागपूर शहरातील पथदिव्यांची साहित्याचा पुरवठा करून देखभाल दुरूस्ती करणे" या कामाकरीता मंजूर कालावधीमधे (तीन वर्षे – दिनांक 02.01.2012 ते 01. 01.2015) शहरातील पथदिव्यांच्या संख्येमधे झालेल्या वाढीमूळे तसेच उर्जा बचतीतून परतफेड करण्याच्या धर्तीवर बोलविण्यात आलेले कंत्राट रद्द झाल्याने या कंत्राटातील पथदिव्यांच्या देखभाल दुरूस्तीचे कामही नविन निविदा होईपर्यंत करवून घेण्याच्या पार्श्वभूमीवर खर्चात झालेली वाढ या कारणांकरीता दिनांक 02.01.2012 ते 01.01.2015 या मंजूर कालावधीमधे एकूण खर्चाची रक्कम रू. 700 लक्ष ने वाढवून देण्यास व या कंत्राटातील मंजूर एजन्सीजकडून काम करवून घेण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन दिनांक 01.01.2015 हा कंत्राट संपूष्टांत येत असल्यामुळे कार्यालयाने पथदिव्यांचा देखभाल दुरुस्तीची नविन निविदा 15 दिवसाच्या मुदतीच्या काढण्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 384** :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर